# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

**कृषि नगर, वसमत रोड,**

**परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)**

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.gov.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५,२२३५८२ |


**संदर्भ:** १. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. अेपीसी-३०, दि.२२-११-१९८८

२. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. अेपीसी-१, दि.११-०१-२०१८

३. महाराष्ट्र शासन यांची अधिसूचना क्र. आरटीआर-२०१४/प्र.क्र.३५५/१२ दिनांक.०६ जून, २०१७

४. महाराष्ट्र शासन यांची अधिसूचना क्र. कृषिआ-१६१३/प्र.क्र.१९१/१६-ए, दिनांक.२९ जानेवारी, २०१८

५. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र.२०२४/सं.क्र.४०६/आस्था-३ दिनांक ०४-०१-२०२४

**गट-'क' मधील संवर्गांना विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करणेबाबत...**

## शुध्दीपत्रक

**जा.क्र.२०२४/सं.क्र.४०६/आस्था-३/** 3408

**दिनांक १०-०७-२०२४**

विद्यापीठ सेवेत गट 'क' मधील संवर्गाना विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण होणे अथवा सुट मिळविणे बाबतचे विद्यापीठ परिपत्रक दिनांक ०४-०१-२०२४ अन्वये, निर्गमीत करण्यात आलेले आहे. त्यामुळे परिपत्रक निर्गमीत झालेल्या दिनांकापासुन म्हणजेच दिनांक ०४-०१-२०२४ रोजी पासुन त्यापुढे गट 'क' मध्ये सरळसेवेने अथवा पदोन्नतीने नियुक्त होणा-या कर्मचा-यांना विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परिक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहिल.

तसेच विद्यापीठ परिपत्रक दिनांक ११-०१-२०१८ नुसार वर्ग-४ मधुन वर्ग-३ मध्ये पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांना विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे. तथापी वर्ग-३ मध्ये पदोन्नती झाल्यानंतर सदरील कर्मचा-यांना वर्ग-३ मधील वरच्या पदावर पदोन्नतीसाठी विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परिक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहिल. उर्वरीत परिपत्रकात कोणताही बदल नसून संदर्भिय क्रमांक ५ वरील परिपत्रक निर्गमीत केल्याच्या दिनांकापासुन लागु राहिल.

**मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने,**

(पु. को. काळे) 10/7/24.
**कुलसचिव**
**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी**

**प्रतिलिपी:** संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण/सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण)/विद्यापीठ अभियंता/नियंत्रक, वनामकृवि, परभणी *यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक आपल्या अधिनिस्त कार्यालयातील लिपीकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्या निर्दशनास आनावे.*

**प्रत:**

१. मा. कुलगुरू महोदय यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.

२. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी *यांना देऊन कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक* **वर्ग-'क' मधील संवर्गांना विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे बाबतचे शुध्दीपत्रक अनिवार्य करणेबाबत...** *या शिर्षकाखाली विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.*